प-३५

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

प्र.ले./वित्त/प्रकल्प/ 25 दि. 12/०७/२०२२

विषय: महानगरपालिकेद्वारे हाती घेण्यात येणारी विविध प्रकल्प कामे तसेच प्राप्त करण्यात येणा-या वस्तु व सेवा इत्यादीबाबतच्या ई-निविदा/निविदा/दरपत्रक यामध्ये वस्तु व सेवा कराच्या अनुषंगाने अंतभूत करावयाच्या अटीबाबत.

संदर्भ: १) प्र.ले./वित्त/प्रकल्प/शहर/३३ दि.०४.०३.२०१७

२) प्र.ले./वित्त/प्रकल्प/शहर/१२०अे दि.०८.०५.२०१७

३) प्र.ले./वित्त/प्रकल्प/शहर/८ दि.१४.०७.२०१७

४) प्र.ले./वित्त/प्रकल्प/शहर/२८ दि.१०.११.२०१७

५) Press Release: 47th Meeting of the GST Council, Chandigarh 28th and 29th June, 2022.

बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे हाती घेण्यात येणाऱ्या विविध प्रकल्प कामे तसेच प्राप्त करण्यात येणा-या वस्तु व सेवा इत्यादीबाबतच्या ई-निविदा/निविदा/दरपत्रक यामध्ये वस्तु व सेवा कराच्या अनुषंगाने अंतभूत करावयाच्या अटीबाबत संदर्भित परिपत्रकान्वये सूचना प्रसृत केल्या आहेत.

वस्तु व सेवाकरांच्या दरात फेरबदल करण्याबाबत शासन विचाराधीन असल्याने महानगरपालिकेतील विविध कामांच्या निविदांबाबत संभाव्य निविदाकार महापालिकेस निवेदन सादर करत आहेत. अतएव, महानगरपालिकेद्वारे हाती घेण्यात येणारी विविध प्रकल्प कामे तसेच प्राप्त करण्यात येणा-या वस्तु व सेवा इत्यादीबाबतच्या ई-निविदा/निविदा/दरपत्रक यामध्ये संदर्भित क्र.५ अन्वये दिलेल्या वस्तु व सेवा कराच्या अनुषंगाने अंतभूत करावयाच्या अटीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.



Scanned with CamScann

| विद्यमान अट | सुधारित अट |
|---|---|
| "GST and other state levies/cess which are not subsumed under GST will be applicable. The tenderer shall quote inclusive of all taxes. It is clearly understood that BMC will not bear any additional liability towards payment of any Taxes &Duties.<br>Wherever the services to be provided by the Tenderers, falls under Reverse Charge Mechanism, the Price quoted shall be exclusive of GST, but inclusive of Taxes/Duties/Cess other than GST, if any.<br>Rates accepted by BMC shall hold good till completion of work and no additional individual claim shall be admissible on account of fluctuations in market rates; increase in taxes/any other levies/tolls etc. except that payment/recovery for overall market situation shall be made as per Price variation. | "GST and other state levies/cess which are not subsumed under GST will be applicable. The tenderer shall quote inclusive of all taxes <u>applicable at the time of bid submission</u>. It is clearly understood that BMC will not bear any additional liability towards payment of any Taxes & Duties.<br>Wherever the services to be provided by the Tenderers, falls under Reverse Charge Mechanism, the Price quoted shall be exclusive of GST, but inclusive of Taxes/Duties/Cess other than GST, if any.<br>Rates accepted by BMC shall hold good till completion of work and no additional individual claim shall be admissible on account of fluctuations in market rates; increase in taxes/any other levies / tolls etc. except that payment/recovery for overall market situation shall be made as per Price variation **and if there is any subsequent change (after submission of bid) in rate of GST applicable on the work/services to be executed as per tender, i.e. any increase will be reimbursed by BMC whereas any reduction in the rate of GST shall be passed on to BMC as per the provisions of the GST Act.** |

उपरोक्त सुधारीत अट ही ज्या कामांच्या ई-निविदा/निविदा/दरपत्रक दस्तऐवज यामध्ये समाविष्ट केलेली असेल फक्त त्याच कामांकरिता लागू असेल.

अतएव, प्राप्त होणारे देकार प्रचलित वस्तु व सेवा करांच्या दरानुसार प्राप्त होणार असल्याने, सध्या ज्या ई-निविदा/निविदा/दरपत्रक मागविलेल्या आहेत अशा निविदांमध्ये



Scanned with CamScanner

नियत दिनांकापूर्वी शुद्धीपत्रकाद्वारे उपरोक्त सुधारीत अट समाविष्ट करण्याबाबत तसेच यापुढे मागविण्यात येणाऱ्या ई-निविदा/निविदा/दरपत्रक यांमध्ये उपरोक्त सुधारीत अट समाविष्ट करण्याची संबंधित खातेप्रमुख यांनी दक्षता घ्यावी. तसेच वस्तु व सेवा कराच्या दरातील बदल हा शासन निर्णयामधील दिनांकापासुन प्रभाव्य राहिल.

सर्व खातेप्रमुख, रूग्णालयांचे अधिष्ठाता, सहायक आयुक्त, यांनी उपरोक्त सुचनांचे काटेकोरपणे अनुपालन करावे.

(पांडुरंग गोसावी)
प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.)

(प्रदिप पडवळ)
प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.

(रामदास आव्हाड)
उप आयुक्त (वित्त)

(पी. वेलारासू)
अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)

*F:\B Drive\GST\MCGM-GST.2017\MCGM CIRCULAR\Word Files\Circular- Modification in Tax Condition.docx*

Scanned with CamScanner